बंजारा शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित

# कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,

## हणेगाव.ता. देगलूर. जि. नांदेड.

## विभाग - मराठी.

### वर्ग : बी. ए. तृतीय वर्ष Sem. V वा

### साहित्य विचार. पेपर X वा.

**प्रा. सौ. कांबळे एस. एस.**

## -: साहित्याचे प्रयोजने :-

### प्रस्तावना

मानवनिर्मित प्रत्येक गोष्ट हेतुपूर्वक निर्माण झालेली असते. साहित्य निर्मितीमागे ही सहेतुकता असते. प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांनी उपस्थित केलेल्या प्रयोजन विचारात यशप्राप्ती, अर्थप्राप्ती, किर्ती या सारख्या लौकिक काव्यप्रयोजनां पासून ते परतत्वाची साक्षात्कार घडवून आणणे या सारखे अलौकिक काव्य प्रयोजनही सांगण्यात आले आहे. ते म्हणतात कीं, प्रयोजन म्हणजे हेतु, कारण, प्रयोजन असे प्रयोजनासंदर्भात सांगून यशप्राप्ती व आनंद हेच साहित्यनिर्मितीचे अंतिम प्रयोजन आहे. हे स्पष्ट केली आहेत.

भामंहाच्या मते, धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ लागून चौसष्ट कलांमध्ये प्रगती होऊन प्रिती म्हणजे आनंद व किर्ती म्हणजे यश यांचीही प्राप्ती होते. वामनाच्या दृष्टीने 'प्रीती व किती' ही दोनच प्रयोजने महत्वाची ठरतात.

मम्मटाने सांगितलेली काव्यप्रयोजन महत्वाचे मानली जातात.

"काव्यं यशसे, अर्थकृते, व्यवहारविदे, शिवेत रक्षतये ।

सद्य परिनिर्वृतयेकान्तायोपदेश युजे ।”

या संस्कृत सुभाषितातून साहित्याची सर्वसामान्य प्रयोजने मांडलीआहेत. ते खालील प्रमाणे.

## १) यशप्राप्ती :-

मम्मटाने आपल्या सुप्रसिध्दकारिकेत क्रमाने पहिले येणारे हे काव्यप्रयोजन सांगितले आहे. काव्यलेखनामूळे यश किंवा किर्ती मिळते. हे सगळेच मान्य करतील. मनुष्य स्वभावानुसार प्रसिध्दी सर्वांनाच हवी असते. आपण कांही केल्यास आपले नांव व्हावे याची अपेक्षा मनुष्याला असतेच. कवी हा कितीही समजूतदार असला तरी तोही आपल्या साहित्यकृतीचे कौतुक व्हावे याच विचाराचा असतो.

असे असले तरी कांही मर्यादेपर्यंतच काव्यलेखनाचे प्रयोजन म्हणून याकडे बघता येईल सर्व संतकवी किंवा आधुनिक वाङ्मयेतिहासातील प्रतिभावंत कवी लेखकांनी केवळ यशासाठी साहित्यलेखन केले असे म्हणने चुकीचे ठरेल. तसेच बऱ्याच वेळेस लौकिक यश मिळविणे तर बाजूलाच राहिले. उलट प्रतिकूल टीकेला तोंड द्यावे लागते. केवसुत, बालकवी यांसारख्या कवींना मरणोत्तर लोकप्रियता मिळाली तेंव्हा यश हे प्रयोजन मर्यादित अर्थानेच घ्यावे लागेल. वाचकांच्या दृष्टीनेही हे प्रयोजन लागू होत नाही.

## २) अर्थप्राप्ती :-

प्रत्येक मनुष्याला व्यवहारिक जीवन व्यतित करण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. आपल्या श्रमाच्या प्रतिभेच्या बळावर माणूस अर्थप्राप्ती करुन घेतो. प्राचीन काळापासून आपल्या प्रतिभेचा उपयोग पैशासाठी करणारे जसे आढळतात त्याच प्रमाणे आजही कांही साहित्यकार पैशासाठी लेखन करीत असल्याचे दिसून येते. मम्मटाने हर्षापासून ते भरतमुनी या आद्य साहित्यशास्त्रज्ञाने नाटय, वाङ्मयाचे प्रयोजन पुढील प्रमाणे सांगितले आहे. समर्थ दुःखार्त व असमर्थ शोकार्त यांना विश्राम मिळावा म्हणून हे नाट्य आहे. याचा अर्थ असा की, 'जो समर्थ आहे. त्यालाही आणि असमर्थ आहे त्यालाही दुःख होतेच अशा लोकांचे दुःख निवारण्यासाठी, त्यांना समाधान मिळण्यासाठी असे नाट्याचे प्रयोजन सांगितले आहे.'

. पण सर्वच साहित्यिकांबद्दल असे म्हणता येणार नाही. प्रवीर काळातील कवी नरेंद्र हे याचे उत्तम उदाहरण आहे. सं तुकाराम यांनी एक छदामही घेतल्याचा कोठे उल्लेख नाही. केशवसूत, बालकवी यांनी किती अर्थी झाली असेल हा प्रस्तव आहे. आज होशीयारस्वत पैसे खर्च काढणारेही आहेत. रसिकाच्या दृष्टीने या प्रयोजनाचा विचार करता येत नाही

## ३) व्यवहारज्ञान :-

साहित्य वाचनाने वाचकांच्या जाणिवा विकसित होतात. व्याया अनुभूतीश दाते तो अधिक सहानुभूतीपूर्वक जीवनाकडे बचावास शिकतो. महाभारतातील माताद्रौपदी, सत्यनिष्ठ, धर्मराज, उदार कर्म, कपटी शकुनी ही पात्रे, तर रामायणातील एकददनी राम त्यागी सीता अंहकारी रावण सेवावृत्ती लक्ष्मणही पात्रे अनुभवल्यास वाचकाला कसे वागावे ? कसं वागु नये ? याचे ज्ञान मिळतं. हॅम्लेटच्या अंत:करणातील नैतिक संघर्ष, कर्तबगारपणा, महत्वाकांक्षेस बळी पडलेल्या का अधःपात, वेल्लेच्या जीवनात संशयामुळे झालेला अनर्थ याच्या वाचनातून वाचकाला मानवी स्वभावातील काही रहस्यांचे आकलन होते व त्यामुळे एक प्रकारचे समाधान मिळते. अनेक साहित्यकृती वाईट संगतीचे व्यसनार्थ व्यभिचाराचे दुष्परिणाम कसे होतात ? याचे ज्ञानदेतात. व्यवहारज्ञान प्रयोजन लेखकाच्या बाबतीत संमदत नाही. कारण ज्या व्यवहार ज्ञानाचे दर्शन तो करीत असतो त्याचा अनुभव त्याने अगोदरच घेतलेला असतो. तो व्यवहार स्याला जागवायचा नसतो. यास प्रयोजन न म्हणता परिणाम म्हणता येईल. काव्य वाचताना वाचकांच्या मनात व्यवहार जाणून घेण्याची इच्छा असेलही. परंतु दर सांगितल्याप्रमाणे लेखकाच्या मनात ती इच्छा असत नाही.

## ४) अशुभ निवारण :-

अशुभ निवारण हे प्राचीन काळात स्वाभाविक वाटणारेपरंतु आजच्या नैतिकयुगात कालबाह्य ठरणारे असे काव्यप्रयोजन मम्मटाने सांगितले आहे. काळ बदलतो तर माणसाचा दृष्टीकोन समजुती, विचार बदलत राहतात हेच तर मानवी जीवनाचे रहस्य आहे. म्हणूनच तर काव्यनिर्मिती ही केवळ कलानिर्मिती नव्हे. तर परमेश्वराची उपासना आहे. अशी असलेल्या काळातील अशुमनिवारण हे काव्यप्रयोजन आज कालबाह्य ठरते.

मम्मटाने कांही उदाहरणे देऊन पटवून देण्याचा प्रयत्न केला की, अशुभ निवारणार्थही काव्यनिर्मिती करण्यात आली आणि हा हेतू नजरेसमोर ठेवून ज्यांनी ज्यांनी काव्यनिर्मिती केली त्यांचा मानसही पूर्ण झाला. जसे की, मयूर कवी. जगन्नाथ पंडित, कृष्णदयार्णव यांची नांवे सांगतायेतील.

मयुराने 'सुर्यशतक' लिहिल्याने कुष्ठरोग बरा झाला. जगन्नाथ पंडितांनी यवन स्त्रीशी संबंध ठेवल्याने ब्राम्हणाने बहिष्कार टाकला, तेव्हा त्यांनी 'गंगालहरी' नावाचे काव्य लिहिले. गंगामातेकडून पवित्र झाले. प्रत्येक श्लोकाबरोबरपाणी एकेक पायरी चढत होते व शेवटी त्यांना गंगामातेच्या पाण्याने स्पर्श केला व ते पवित्र झाले. मयुर कवीप्रमाणेच कृष्णदयार्णव यांचाही कुष्ठरोग बरा झाला यासाठी त्यांनी 'हरिवरदा' या ग्रंथाची निर्मिती केली त्याच प्रमाणे बिल्हण कवी तुलसीदास यांचीही उदाहरणे दिली जातात.

ही सर्व उदाहरणे एकतर प्राचिन काळातील आहेत. शिवाय या काळास काव्य म्हणावे का? हा प्रश्नच आहे. आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासात अशी उदाहरणे फारशी आढळत नाहीत. आजच्या तंत्रवैज्ञानिक युगात तर याच्यावर विश्वास ठेवता येणारच नाही. पण अधिक व्यापक संदर्भात ह्या उदाहरणांचा विचारकरणे शक्य आहे. मनुष्यास आपले दुःख, विंचना ताणतणाव विसरायला लागण्याचे सामर्थ्य वाङ्मयात आहे. निर्माता, साहित्यनिर्मितीच्या वेळी अलौकिक आनंदात न्हाऊन निघतो. त्यामुळे लौकिक जीवनातील दुःख तो विसरून जातो. वाचकसुध्दा श्रेष्ठ साहित्यकृती वाचताना स्वतःला पण तो हरवून बसतो. एका अर्थाने हे 'अशुमनिवारणच' आहे.

## ५) कांतासंमित उपदेश :-

मम्मटाच्या मते साहित्य तीन प्रकारे बोधप्राप्ती करून देण्याचेकार्य करते.

१) प्रभुसंमित २) सुन्हतसंमित, ३) कांतासंमित वेद, श्रुतिस्मृति इत्यादी वाङ्मयातील उपदेश 'प्रभुसंमित असतो इतिहास पुराणातील उपदेश सुन्हत्संमित असतो आणि तिसरा ललित वाङ्मयातून उपदेश कांतासंमित असतो साहित्यातील उपदेश हा सरळ नसतो. तो आडवळणाने सांगितलेला असतो. पहिला उपदेश आज्ञेच्या स्वरुपाचा दुसरा उपदेश सल्ल्याच्या स्वरुपाचा व तिसरा अप्रत्यक्ष स्वरुपाचा असतो. '

पत्नी आपल्या पतीला ज्या लडिवाळपणे उपदेश करते अर्थात आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळवण्यासाठी कसब वापरते, त्यालाच कांतासंमित उपदेश असे म्हणतात. कठोर शब्दात उपदेश केलेला कोणालाही रुचत नाही तीच गोष्ट जर हळूवारपणे, प्रेमाने सांगितली तर ऐकणाराही सांगितले तसे करण्याचे मान्य करतो. भावनात्मक आवाहन करणे हे कांतासंमित उपदेशाचे रहस्यआहे.

### ६) आनंदप्राप्ती :-

साहित्यनिर्मिती व साहित्यवाचन ह्या दोन्ही प्रक्रिया लौकिक कायद्यासाठी जसे की यशप्राप्ती, अर्थ प्राप्ती, अशुमनिवारण यासाठीही केल्या जातात असे मम्मटाने प्रतिपादन केले आणि शेवटी उच्चतर आनंदप्राप्ती हे प्रयोजन सांगितले. इतर पाच काव्यप्रयोजना बद्दल दुमत होऊ शकते किंवा ते पूर्णपणे स्वीकारता येत नाही. कारण पैशासाठीच सारे लिहितात असे नाही. तर कांहीजण यशासाठीही लिहितील किंवा या दोन्हीसाठी नाही तर बोध देण्यासाठी लिहितील. म्हणूनच वरील पाच प्रयोजने प्रासंगिक आहेत. अर्ध अधुरे ठरतात. शिवाय जे प्रयोजन लेखकाला लागू होते ते वाचकाला लागू होईलच असे नाही, म्हणून एक पक्षीय आहेत. निव्वळ आनंदप्राप्ती हे प्रयोजन नित्यस्वरुपाचे लेखक व वाचक ह्या दोन्हींना लागू होणारे आहे.

वाचक साहित्य वाचताना आपले लौकिक विश्व विसरुन कांही काळ का होईना कलाकृतीतील विश्वात रममाण होतो. प्रत्यक्ष जीवनातील ताणतणाव, दुःख, विवंचना विसरुन एका वेगळ्याच मस्तीत तल्लीन होऊन साहित्याचा आस्वाद घेतो. त्याला लौकिक स्वरुपाची एखादी वस्तू

किवा पदवी मिळालेली नसते तरीही तो आनंदी होती. मानसिकदृष्टया त्याला वेगळीच अनुभूती येते. जी त्याला हवीहवीशी वाटते.

लेखक जुन्याच अनुभवांना रेखाटित असला तरी त्याला अनुभव मांडताना पुन्हा एकदा आपण त्या भावविश्वात गेल्याचा प्रत्यय होतो. दुःखद प्रसंग मांडतानाही त्या प्रसंगाकडे 'तटस्थपणे पाहण्याची क्षमता असते आणि काळाच्या ओघात हातातून निसटून गेलेले, हवेहवेसे वाटणारे रेखाटताना ते आठवणीच्या विश्वात रममाण होतो. से क्षण पुन्हा जगण्याचा अनुभव घेतो.'

माझ्याकडे सांगण्यासारख काहीतरी आहे. ज्याचं स्वरुप बोध देण्यापेक्षा काळ आहे. एखाद्या सौंदर्यदायक अनुभवा नंतर येणारी अनुभूती जशी असते तशी अनुभूती वाचकांना मिळेल अशी उर्मी लेखकाच्या ठिकाणी निर्माण होते, तेव्हाच तर तो लेखनास प्रवृत्त होतो. आनंद व आल्हाद हेच साहित्याचे खरे प्रयोजन म्हणावयास हवे. इतर प्रयोजने प्रासंगिक, अनित्य, एकपक्षीय स्वरुपाचीहोत.

एकुणच प्राचीन साहित्य शास्त्रज्ञांनाच्या काव्यप्रयोजनांचा विचार करता साहित्य सृष्टीचा निर्माता लेखक कवी हा असतो. साहित्य कृतीची निर्मिती करण्यामागील त्याचे प्रमुखप्रयोजन वाचकाला आनंददेणे हेच असते. इतर अनुषंगिक प्रयोजने होत असेच म्हणावे लागेल.

# धन्यवाद !

